IMPACT FACTOR
5.473(SJIF)

UPA NATIONAL E-JOURNAL
*Interdisciplinary Peer-Reviewed Journal*

ISSN
2455-4375

# महाराष्ट्रातील समाजसुधारक चळवळीचे प्रमुख नेते

**डॉ. मीनाक्षी कुबडे**
डॉ.आंबेडकर कॉलेज ऑफ सोसीअल वर्क ,वर्धा
मो .न .९८२३८९४८२१

---

**सारांश :**

*महाराष्ट्राची भूमी सामाजिक, सांस्कृतिक आणि बौद्धिकदृष्ट्या खूप समृद्ध आहे. १९ व्या आणि २० व्या शतकात, अनेक समाजसुधारक येथे जन्माला आले ज्यांनी सामाजिक असमानता, जातिवाद, अंधश्रद्धा, लिंग असमानता, अस्पृश्यता यासारख्या दुष्कृत्यांविरुद्ध प्रभावी काम केले. या संशोधन पत्रात, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे, संत गाडगेबाबा, भाऊ दाजी लाड, आचार्य बाळशास्त्री जांभेकर , गोपाळ हरी देशमुख (लोकहितवाडी)इत्यादी महाराष्ट्रातील प्रमुख समाजसुधारकांच्या योगदानाचे विश्लेषण केले आहे. वरील विषयाबाबत संशोधन करत असताना तथ्य एकत्रित करण्यासाठी दुय्यम तथ्य संकलन साधनांचा उपयोग करण्यात आला. प्रामुख्याने संशोधनातून असे दिसून येते की, वरील समाज सुधारकांच्या कार्यामुळे व त्यांनी उभारलेल्या विभिन्न चळवळीमुळे अनेक पातळ्यांवर व विभिन्न काळात, विविध स्तरात परिवर्तन घडून आले. हे परिवर्तन पुढील काळासाठी प्रेरणादायी ठरले. अस्पृश्यता निवारण, शिक्षण, समानता, लोकशाही, स्त्री -पुरुष समानता, ग्राम सुधार, स्वच्छता, अंधश्रद्धा निवारण अशा अनेक बाबींमध्ये परिवर्तन घडून आले.*

**बिजशब्द** : समाजसुधारक, चळवळी, प्रमुख नेते

---

**प्रस्तावना :**

भारतीय समाज बऱ्याच काळापासून अनेक सामाजिक दुष्कृत्यांनी ग्रस्त आहे. विशेषतः जातिव्यवस्था, महिलांचा दर्जा आणि अंधश्रद्धा यामुळे समाजाच्या प्रगतीत अडथळा निर्माण झाला. परंतु महाराष्ट्रासारख्या राज्याने सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात आघाडीची भूमिका बजावली. येथे अनेक विचारवंत नेते जन्माला आले ज्यांनी केवळ सामाजिक असमानतेवर हल्ला केला नाही तर, समतावादी समाज स्थापनेचा मार्गही मोकळा केला.या संशोधन पत्राचा उद्देश महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे विचार, कार्य आणि योगदान यावर चर्चा करणे आहे .ज्यांनी समाजात नवीन विचारांना जन्म दिला आणि भारताची सामाजिक जाणीव बळकट केली.

**मुख्य विषय :**

**१. भाऊ दाजी लाड :**

ते एक प्रसिद्ध डॉक्टर, शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांनी शिक्षण आणि ऐतिहासिक संशोधनाचा प्रसार केला. त्यांची गणना मुंबईतील पहिल्या नागरी डॉक्टरांमध्ये केली जाते. त्यांनी मुंबई

विद्यापीठाच्या स्थापनेतही योगदान दिले. यांनी जगन्नाथ शंकर शेठ यांच्या मदतीने बॉम्बे असोसिएशन हे संस्था स्थापन करून तिच्या मार्फत ब्रिटिश पार्लमेंटला पत्र लिहून जनतेचे हाल कळविले. ते स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणारे होते त्यांनी अनेक ग्रंथालय सुरू केले विधवा विवाहस पाठिंबा दिला मादक द्रव्याच्या सेवनावृत्त मोहिमा सुरू केल्या.

**२. आचार्य बाळशास्त्री जांभेकर :**

त्यांना मराठी पत्रकारितेचे जनक म्हटले जाते. 'दर्पण' नावाचे मराठी साप्ताहिक मासिक सुरू करून त्यांनी लोकांना सामाजिक आणि शैक्षणिक समस्यांबद्दल जागरूक केले. त्यांनी तार्किक विचारसरणी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला चालना दिली. परिवर्तनाच्या काळात व्यापक दृष्टीने विचार करून समाजाला जागृत करणारा ,तसेच मराठीच्या पहिल्या वृत्तपत्राचे जनक, पहिले समाजसुधारक, इतिहास संशोधक व विचारवंत म्हणून आचार्य जांभेकरांचे नाव महत्त्वाचे मानले जाते. त्यांनी 1840 मध्ये दिग्दर्शन हे मराठी मासिक सुरू केले. सनातन आचार विचारांना त्यांचा विरोध होता. सामाजिक व धार्मिक सुधारणा त्यांनी पुढाकार घेतला. म्हणूनच मराठी वृत्तपत्राचे जनक त्यांना मानले जाते.

**३. गोपाळ हरी देशमुख (लोकहितवाडी) :**

त्यांनी 'लोकहितवाडी' या नावाने लेख लिहिले आणि सामाजिक दुष्कृत्यांवर तीव्र टीका केली. भारतीय समाजाला अंधश्रद्धा आणि रूढींपासून मुक्त करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. त्यांनी विधवा पुनर्विवाह, महिला शिक्षण यासारख्या विषयांवर आपले विचार मांडले.

**४. महात्मा ज्योतिबा फुले :**

सामाजिक समता आणि न्यायाचे ते प्रणेते होते. त्यांनी 'सत्यशोधक समाज' स्थापन केला आणि महिला शिक्षणासाठी आणि शूद्र आणि अतिशूद्रांच्या हक्कांसाठी लढा दिला. सावित्रीबाई फुले यांच्यासोबत त्यांनी पहिली महिला शाळा उघडली. त्यांनी प्रामुख्याने अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी शाळा उघडल्यात व मुलींच्या शिक्षणाची सोय केली. महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी मुलांना शिक्षण घेता यावे यासाठी बोर्डिंग स्थापन केले. विधवा पुनर्विवाहाचे त्यांनी समर्थन केले. बाल प्रतिबंधक गृहाची त्यांनी स्थापना केली. शेतकऱ्यांची कैफियत त्यांनी इंग्रज दरबारी मांडली. सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करण्यासाठी इंग्रजांकडे पाठपुरावा केला .अस्पृश्यांसाठी स्वतःच्या घराची दारे उघडी केली व अस्पृश्यांना जेवढी मदत करता येइल तेवढी मदत केलि .त्यांनी अनेक समाज प्रबोधन पर ग्रंथाचे लेखनही केले. समाजातील सनातन वर्गावर त्यांनी दांभिक टीका केली. त्यांच्या कार्यातून प्रेरणातून घेउन अनेक समाजसुधारक तयार झाले.

**५. राजर्षी शाहू महाराज** :

राजर्षी शाहू महाराज हे आधुनिक महाराष्ट्राचे थोर समाजसुधारक, द्रष्टे राजा व सामाजिक समतेचे प्रणेते होते. ते केवळ एका संस्थानाचे अधिपती नव्हते, तर हजारो दलित, शोषित व मागासवर्गीय लोकांचे उद्धारक होते.

त्यांनी शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय आणि कृषी सुधारणा यावर विशेष भर दिला. त्यांच्या विचारांवर अनेक समाजसुधारक, विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रभावित झाले. शाहू महाराजांनी बहुजन समाजासाठी शिक्षणाचे दरवाजे खुले केले. त्यांनी "शिक्षण हा प्रत्येकाचा हक्क आहे" या विचाराला दिशा दिली.मागासवर्गीय व दलित विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण व वसतिगृहांची सोय.पहिल्यांदा मागासवर्गीयांसाठी राखीव जागा (आरक्षण) शिक्षण व नोकऱ्यांत लागू केल्या.कन्याशाळांची स्थापना करून स्त्रीशिक्षणाला चालना दिली.शिक्षणात शिष्यवृत्ती योजना सुरू केली. अस्पृश्यता, जातीभेद यांना कडाडून विरोध केला. त्यांनी ब्राह्मणेतर चळवळीला राजाश्रय दिला.

**६. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे** :

एक बुद्धिजीवी आणि कायदेतज्ज्ञ म्हणून, रानडे यांनी सुधारणावादी विचारसरणीवर भर दिला. ते 'प्रार्थना समाज'च्या संस्थापक सदस्यांपैकी होते. त्यांनी महिला शिक्षण, विधवा पुनर्विवाह आणि जातिवादाच्या निर्मूलनासाठी काम केले. त्यांनी 'विधवा विवाह' मंडळाची स्थापना करून विधवा विवाह घडवून आणले आणि विधवा विवाहाचे समर्थन केले. त्यावेळी त्यांनी स्मृति आणि पुराणाच्या आधारवर विधवा विवाह शास्त्र समंत असल्याचे दाखवून दिले. संमती विवाह विधेयकांला त्यानी पाठिंबा दिला.ते समाजातील अनिष्ट प्रथांमध्ये सुधारणा करू इच्छित होते.

**७. प्राचार्य गोपाळ गणेश आगरकर :**

आगरकर हे कट्टर सुधारणावादी आणि शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांनी 'सुधारक' पत्रिकेद्वारे सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकला. ते शिक्षणाला सामाजिक क्रांतीचे माध्यम मानत होते. गोपाळ गणेश आगरकर म्हणजेच लोकांमध्ये राहून लोकांच्या वतीने लोकांसाठी लोकहिताच्या गोष्टी करणारा समाज सुधारक होता. प्रामुख्याने त्यांनी स्वतःच्या लेखणीच्या माध्यमातून समाजामध्ये अनेक जनजागृती घडवून आणली. सतीची चाल, केशव पण ,बालविवाह, विधवांची स्थिती ,भारतीय संस्कृतीच्या उच्च मूल्यांविषयीचा आदर, स्त्रियांचे दुःख, स्त्री शिक्षणाचे महत्त्व ,संमती विवाह ,घटस्फोट, पुनर्विवा,ह सनातन्यांची विचारसरणी, लोकांमधील धर्म भोळेपणा, बुरसलेल्या सनातनि चालीरीती अशा अनेक पैलूंवर त्यांनी वृत्तपत्रातून भाष्य केले व याबाबत लोकांमध्ये जनजागृती केली.

**८. महर्षी धोंडो केशव कर्वे :**

विधवांचे पुनर्विवाह कायदेशीर आणि सन्माननीय करण्यासाठी कर्वे यांनी लढा दिला. महिला शिक्षणाला चालना देण्यासाठी त्यांनी 'पदवीधर महिला शाळा' आणि 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ' स्थापन केले. महर्षी धोंडो केशव कर्वे हे विधवा विवाहाचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांनी एका बालविधवेशी पुनर्विवाह केला व समाज सुधारणेचा आदर्श घालून दिला. त्यांनी 1893 साली 'विधवा विवाह प्रतिबंधक निवारक मंडळाची' स्थापना केली. त्यांनी अनाथ बालिकाश्रम सुरू केला. त्यांनी 'निष्काम कर्ममठ' या संस्थेची स्थापना केली. महिलाश्रम व महिला विद्यालय या ठिकाणी निस्वार्थपणे काम करणारे स्त्री शिक्षक, प्रसार व त्यासाठी निधी गोळा करण्याचे काम करणारे समाजसेवक तयार करने हा त्यामागचा उद्देश होता.

**९. संत गाडगेबाबा :**

गाडगेबाबा हे एक लोक संत आणि समाजसुधारक होते. त्यांनी गावातील स्वच्छता, शुद्ध आचरण आणि जातीयता निर्मूलनावर भर दिला. ते त्यांच्या शिकवणींद्वारे जनजागृती करत राहिले. संत गाडगेबाबा हे खऱ्या अर्थाने "जनतेचे संत" होते. त्यांनी कोणताही गोंधळ न करता, गाजावाजा न करता समाजसेवा केली. त्यांचे जीवन आणि कार्य आजही अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी दिलेला संदेश – "सेवा हीच खरी पूजा" – आजही तितकाच महत्त्वाचा आणि कालातीत आहे. त्यांनी संपूर्ण आयुष्य भिक मागून मिळालेल्या पैशातून अनेक धर्मशाळा, विद्यालये, औषधालये, पशुवैद्यालये आणि अनाथाश्रम उभारले. ते कोणत्याही जाती-धर्माचा भेद न करता सर्वांना मदत करत. गाडगेबाबा अंधश्रद्धेचे घनदाट विरोधक होते. त्यांनी धार्मिक कर्मकांडांना विरोध केला आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून जीवन जगण्याचा उपदेश दिला. ते कीर्तन करत समाजातील अंधश्रद्धा, अस्पृश्यता, दारू पिण्याची सवय, अस्वच्छता, अज्ञान, अंधश्रद्धा यावर जोरदार प्रहार करत असत. त्यांच्या कीर्तनात विनोद, उपदेश, लोककथांचा सुरेख संगम असे.

**१०. कर्मवीर भाऊराव पाटील :**

'रयत शिक्षण संस्था' स्थापन करून त्यांनी ग्रामीण आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडले. 'कमवा आणि शिका' सारख्या योजनांद्वारे त्यांनी स्वावलंबन शिकवले. महाराष्ट्रातील शैक्षणिक क्रांतीचे प्रणेते म्हणून ते परिचीत आहेत. जोपर्यंत बहुजन समाजाला शिक्षण मिळणार नाही तोपर्यंत ते पुढे जाणार नाही अशी त्यांची खात्री झाली. १९१० साली सांगली जिल्ह्यातील दुधगाव येथे शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना केली. स्वावलंबन हाच शिक्षणाचा आधार असला पाहिजे, या विचाराचे कर्मवीर भाऊराव पाटील होते. त्यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा वारसा पुढे चालवण्याचा प्रयत्न केला. १९२४ मध्ये सातारा येथे छत्रपती शाहू बोर्डींग हाऊस काढले.

**११. डॉ. बाबासाहेब आंबेडकर :**

भारतरत्न डॉ. आंबेडकर यांनी दलित हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी अस्पृश्यांना सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक न्याय देण्यासाठी चळवळ सुरू केली. बौद्ध धर्मात त्यांचा प्रवेश हा एक क्रांतिकारी पाऊल होता. दलितांमध्ये स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव निर्माण करणारे क्रांतिकारक समाजसुधारक ,भारतीय राज्यघटनेची शिल्पकार, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नामोल्लेख केला जातो.त्यांनी साउथबरो कमिटीसमोर अस्पृश्यांच्या राजकीय हक्काची बाजू मांडली. त्यांनी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली. महाड येते चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. सायमन कमिशन समोर अस्पृश्यांची बाजु मांडली .स्वतंत्र मजूर पक्षाची मागणी त्यांनी केली. नाशिकमध्ये काळाराम मंदिर सत्याग्रह त्यानी केला . पहिल्या गोलमेज परिषदेत त्यांनी अस्पृश्यांच्या वतीने सहभाग घेतला . दुसऱ्या गोरमेंट परिषदतेही त्यांनी अस्पृश्यांच्या बाजूने भाग घेतला .त्यांनी 'शेडूल कास्ट फेडरेशन' नावाच्या पक्षाची स्थापना केली. तसेच प्रामुख्याने भारतीय राज्यघटनेची लिखाण कार्य त्यांनी मेहनतीने पार पाडले. या राज्यघटनेच्या भरवशावर भारतीय लोकशाही ची इमारत उभी आहे.

**१२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज :**

तुकडोजी महाराजांनी ग्रामविकास, स्वच्छता आणि समरसतेचा संदेश दिला. त्यांचे 'ग्रामगीता' हे पुस्तक आजही ग्रामीण विकासासाठी प्रेरणास्रोत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या संदेशातून व कार्यातून सामाजिक समता ,अस्पृश्यता निवारण, समानता ,आरोग्य ,धर्मनिरपेक्षता, बंधुभाव, राष्ट्रीय एकात्मता ,इत्यादी पैलुन बाबत जनसामान्यांना सकारात्मक संदेश दिला. त्यांनी वरील सर्व सामाजिक मूल्यांनी भरून असणारे एकूण दहा ग्रंथ निर्माण केले. ज्यामध्ये ग्रामगीता ,राष्ट्रीय भजनावली ,आत्मकथा व सामुदायिक प्रार्थना यांचा विशेष उल्लेख करण्यात येतो. त्यांनी अनेक भजने गायलीत व ती खंजिरीच्या साथीने खडे आवाजात गाऊन समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला.

**१३. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे :**

ते 'अछूत सुधारक सभे'चे संस्थापक होते. त्यांनी हिंदू समाजातून अस्पृश्यता दूर करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. सर्व धर्मांच्या एकतेवर आणि मानवतावादी दृष्टिकोनावर त्यांचा विश्वास होता. त्यांनी 18 ऑक्टोबर 1906 रोजी ‘डीप्रेस क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया’ या संस्थेची मुंबई येथे स्थापना केली. अस्पृश्यता निवारणाबद्दल लोकमत तयार व्हावे म्हणून त्यांनी सहभोजनाचा मार्ग अवलंबिला. अस्पृश्यना लष्करात भरती करावे ही त्यांची प्रमुख मागणी होती.

**निष्कर्ष :**

महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी त्यांच्या विचारांनी आणि कृतींनी समाजाला जागरूक केले, सामाजिक क्रांतीचा मार्ग मोकळा केला आणि भारताच्या सामाजिक रचनेला एक नवीन आकार दिला. त्यांच्या प्रयत्नांमुळेच आज आपण अधिक समतापूर्ण, शिक्षित आणि न्याय्य समाजाकडे वाटचाल करत आहोत.या सर्व नेत्यांनी हे सिद्ध केले की सामाजिक बदल केवळ राजकारणाद्वारेच नव्हे तर शिक्षण, सेवा आणि आत्मत्यागातूनही शक्य आहे. आजही त्यांचे विचार आणि कृती आपल्यासाठी प्रेरणास्रोत आहेत.

**संदर्भसूचि :**


- कराडे, बी .एम. 2011. *सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र*.नागपुर: पिंपळापुरे अँड के. पब्लिशर्स साळीवकर संजय.2016 .*सामाजिक समस्या आणि समाज सुधार चळवळ*. नागपुर: श्री मंगेश प्रकाशन .
- सिंह, वी .एन .2007. *भारत मे सामाजिक आंदोलन जयपूर* :रावत पब्लिकेशन .
- देवगावकर ,एस.जी, देवगावकर ,शैलजा .2009. *सामाजिक चळवळी परंपरागत आणि नवीन* . नागपूर :श्री साईनाथ प्रकाशन.